
# बुटका राक्षस




या जपानी गोष्टीत एक राजकुमार आणि एक राजकन्या जगातल्या एका कोपऱ्यात असलेल्या शांतपूर्ण देशात राहत होते. तिथं सूर्य चमकत होता, चंद्र आकाशात फिरत होता आणि सगळे दिवस एकसारखे होते. जोपर्यंत एक विचित्र असा बुटका राज्याचा दौरा करत नव्हता तोपर्यंत. पण त्यानंतर जीवन अचानक रोमांचक आणि भयावह असे झाले.

बुटका एक बासरी वाजवायचा तेव्हा अनेक बदल व्हायचे. तो नोकरांना थकेपर्यंत नाचण्याची आज्ञा द्यायचा. तो चेरी ब्लॉसमच्या फुलांना खड्यांमध्ये बदलायचा. तो बासरी वाजवायचा तेव्हा राजकुमार मंत्रमुग्ध होवून महालाच्या चारी बाजूला बुटक्याच्या मागे मागे फिरायचा. तो फुलांना कुस्करायचा नोकरांना मारायचा. त्यामुळे राजकुमारी घाबरून पळाली आणि एका म्हाताऱ्या शेतकऱ्याच्या आणि त्याच्या बायकोच्या घरात तिने आसरा घेतला. मग राजकुमारी आणि तिचे नवीन मित्र राजकुमारला भानावर आणण्यासाठी अनेक चतुर उपाय करतात. एक जुनी म्हण आहे –ज्ञान आपल्याला रस्ता दाखवतं, आपण जर शोधला तर आनंद आपल्या नाकाच्या खालीच असतो.




मराठी: अश्विनी बर्वे

# बुटका राक्षस




खूप काळा पूर्वी, समुद्राच्या पलीकडे, जगाच्या एका कोपऱ्यात एक शांतीपूर्ण देश होता, जिथं एका पहाडावर एक सुंदर महाल उभा होता.महालात एक सुंदर राजकुमार मेनिची आणि त्याची सुंदर राजकुमारी मैनिची राहत होते.

तिथले लोक खूप कष्टाळू होते. ते आपल्या राजकुमार आणि राजकुमारीवर खूप प्रेम करत. तिथं सूर्य उगवायचा,चंद्र आकाशात दिसायचा आणि प्रत्येक दिवस आदल्या दिवसापेक्षा अधिक चांगला असायचा.

एका संध्याकाळी राजकुमार मेनिची आणि राजकुमारी मैनीची समुद्रात चमकणाऱ्या चंद्राला बघत उभे होते.

“तो किती सुंदर आहे,” राजकुमारी म्हणाली.

“हो," राजकुमार बडबडला “नेहमीच्या संध्याकाळ सारखाच तर आहे.कधी-कधी मला वाटतं की माझ्या जीवनात काहीतरी नवीन आणि रोमांचक व्हायला हवं.” तेव्हाच क्षितिजावर त्यांना एक छोटी होडी दिसली. वेगाने होडी किनाऱ्यावर आली.






होडीतून एक बुटका बाहेर आला. “मी समुद्राच्या वादळात फसलो होतो,” छोट्या बुटका म्हणाला. “मी थोड्या वेळ इथं आराम करू का?”

“तुमचं आमच्या  शांत आणि शांतिपूर्ण देश मेंमध्ये  स्वागत आहे," राजकुमारी मैनिची म्हणाली.

“आमच्याकडे खूप कमी पाहुणे येतात," राजकुमार मेनिची म्हणाला.

"कृपया आमच्या बरोबर संध्याकाळचे जेवण करा.” थोड्याच वेळात बुटका आलं आणि मोहरी बरोबर भाताचा रोल, मशरूम आणि चिकनचे कटलेट खातांना दिसला.







"कृपया आपल्या सन्मानीय पाहुण्यांसाठी नृत्य करशील का?" राजकुमारने राजकुमारीला विचारले. बुटका म्हणाला, "आज रात्री तुम्ही मला संगीत ऐकवण्याची परवानगी द्या"मग त्याने राजकुमाराची लाकडी बासरी घेतली.

जशी बुटक्याने बासरी वाजवायला सुरुवात केली, तसा एक छोटा उंदीर बासरीच्या तालावर नाचू लागला.काही क्षणात उंदीर गायब झाला आणि एक छोटा सांप बासरीला लपेटलेला दिसला. संगीताचा वेग वाढला तसा साप गायब झाला आणि तिथं एक घुबड आलं. हळूहळू संगीत अधिक जोरात वाजू लागलं. घुबडाने जोरात आवाज केला आणि ते उडून गेलं.

"ही तर जादू आहे!" राजकुमार म्हणाला.

"पण मला भीती वाटते आहे," राजकुमारी कुजबुजली. "घाबरू नको," राजकुमार म्हणाला. "आता बघ आपल्या राज्यात काहीतरी
रोमांचक होईल." थोड्यावेळाने बासरी एकदम ड्रम मध्ये बदलली. बुटक्याने त्यातून गर्जना केल्यासारखा आवाज येई पर्यंत ड्रम पिटला..






“आता नाचा!" बुटका ड्रमच्या तालावर ओरडला. राजकुमार ने राजकुमारीला पकडून त्याला चारी बाजूला फिरवायला सुरु केलं.


"आपण सगळे नाचा!” बुटका नोकरांवर ओरडला. “माझ्या संगीतावर नाचा!”


सगळेजण नाच करू लागल्यामुळे महाल हलू लागला आणि थरथरू लागला.




पण खूप दूर समुद्राच्या किनाऱ्यावर,एक म्हातारा शेतकरी आपल्या स्वप्नातून जागा झाला. “ऐक” तो आपल्या पत्नीला जागं करत म्हणाला. विचित्र आवाज ऐकून शेतकरी आणि त्याची बायको घाबरले. परत ते झोपू शकले नाही. महालात जेव्हा सूर्य उगवू लागला तेव्हा बुटक्याने वाजवणे बंद केले.मग त्यानंतर थकलेले नोकर गाढ झोपले.

ड्रमचे रुपांतर परत एका बासरीत झालं. बुटक्याने आश्चर्यचकित झालेल्या राजकुमाराला बासरी परत केली. “संगीतामुळे महालाची इमारत खचली आहे!” राजकुमारी ओरडली. “काही हरकत नाही,” तिचा पती म्हणाला. “पण मला तर मजा आली” “जर तुम्ही माझ्या मागे-मागे आलात तर तुम्हांला अजून मजा येईल.” बुटका म्हणाला."







मग बुटका परत बागेतल्या सगळ्यात मोठ्या चेरीच्या झाडाजवळ आला आणि  त्याच्या सगळ्यात उंच फांदीवर चढला. राजकुमारपण त्याच्या मागे चढला.लवकरच झाडाच्या बुंध्यात फट पडू लागली,फांद्या तुटू लागल्या. “तू आमचं सुंदर चेरीचं झाड नष्ट करत आहे.” राजकुमारी ओरडली . “हे लगेच बंद कर.”
“तू माझ्या चांगल्या मित्रावर रागवत आहेस!” राजकुमार ओरडला. बुटक्याने जोरात झाड हलवलं.

चेरी ब्लॉसम  चे झाड दगडामध्ये रूपांतरित झालं. त्यावरचे खडे राजकुमारी वर पडू लागले. “त्याला थांबव” राजकुमारीने विनंती  केली. “तो खूप दुष्ट आहे . तो आपल्याला दुःख देईल.”


“त्या मूर्ख महिले पासून सुटका करून घे” बुटका राजकुमाराला म्हणाला. “तू माझ्या बरोबर नाच करू शकतो आणि तुम्ही सगळे माझ्याबरोबर खेळू शकतात.”

बुटका चेरीच्या झाडावरून खाली उतरला. “माझ्यासाठी थांब,” राजकुमार  ओरडला. मग ते दोघं फुलं पायदळी तुडवत नाचू लागले. “शुद्धीवर ये!” राजकुमारीने विनंती केली. “हा दुष्ट खेळ बंद कर!”

“खेळ!" बुटका म्हणाला. “मी तुला चांगलाच खेळ दाखवतो!”









मग बुटक्याने आपला हात हलवला आणि एक बुद्धिबळाचा बोर्ड दिसू लागला. “बुद्धिबळाच्या सोंगट्यानी उड्या मारल्या आणि राजकुमारीचा पाठलाग करू लागल्या. “चल, आत ती निघून गेली, माझ्या प्रिय मित्रा!” राजकुमार बडबडला.


“आता आपण खेळू शकतो आणि खूप मजा करू शकतो.”


राजकुमारी महालातून पळाली. ती पळत त्या ठिकाणी आली जिथं तो म्हातारा शेतकरी आणि त्याची पत्नी राहत होते. “मला माझ्या पतीला आणि माझ्या घराला एका दुष्ट बुटक्या पासून वाचवायचे आहे,” राजकुमारीने रडत सांगितले. “आम्ही जरूर मदत करू,” शेतकरी म्हणाला. मग सगळ्यांनी मिळून चहा प्यायला. त्यानंतर राजकुमारी म्हणाली, “तुम्ही माझ्याबरोबर चला, मी एक युक्ती शोधली आहे.”



महालात, राजकुमार आणि बुटका वरखाली उड्यामारत होते आणि झोपलेल्या नोकरांना मारत होते. “निघा, निघा,” राजकुमार ओरडला, “ही पार्टीची वेळ आहे. माझा सगळ्यात चांगला मित्र आपल्याला काही अद्भुत जादू दाखवेल.”







बुटक्याने एक कलाकारी केली ज्यामुळे राजकुमाराच्या नाकात एक उंदीर लटकू लागला. राजकुमार हसू लागला तेव्हा तो गायब झाला आणि राजकुमाराच्या कंबरेला एक साप लटकू लागला. राजकुमार घाबरून कापू लागला. सापाचं रुपांतर एका वटवाघळात झालं. ते राजकुमाराच्या डोक्यावर जावून बसलं. “थांब थांब!”

राजकुमार ओरडला. “मला आता खेळ आवडत नाही.या. “मग बुटक्याने डबल कलाकारी केली आणि तो विशाल राक्षसामध्ये रूपांतरित झाला. मग बुटक्याने आपल्या हातात एक जळती तलवार घेतली.


“आता तू माझ्यासाठी काम कर” बुटका ओरडला.

“चल ही तलवार गिळून टाक.”

“मी हे करू शकत नाही,”राजकुमार म्हणाला.


“चल आपण पहिल्या सारखे मित्र मित्र खेळू या,”


“तू मूर्ख आहेस,मी कधीही तुझा मित्र नव्हतो!” बुटका म्हणाला. “मी तुला नष्ट करायला आणि तुझ्या राज्यावर कब्जा करायला आलो आहे.”




तेव्हाच एक विशालकाय राक्षस प्रकट झाला. या विशाल राक्षसाचे अनेक हात होते आणि त्याच्या प्रत्येक हातात तलवार होती. “तू मला घाबरवू नको!” बुटका ओरडला. “मी तुझ्यापेक्षा दहापट मोठा होवू शकतो आणि तुझ्यासारख्या राक्षसाबरोबर लढू शकतो.” मग बुटक्याने एक श्वास घेतला.त्याने स्वतःला खूप मोठा, खूप मोठा करण्याचा प्रयत्न केला. मग हातात तलवार घेवून विशाल राक्षस पुढे सरकला.







एक जोरदार आवाज आला. महाल थरथरला. सगळा देश हलू लागला. बुटक्या राक्षसाचे एक हजार तुकडे झाले. “बुटका मेला” लोक आश्चर्य करत म्हणाले. “त्याची जादू नष्ट झाली!”



आता विशालकाय राक्षसाच्या पायावर राजकुमार मेनिचीने आपले गुडघे टेकवले.

“माझं जीवन वाचवल्याबद्दल तुमचे मनापासून आभार. मला माहित नाही आपण कोण आहात ते,” तो म्हणाला..

“रडणे बंद कर, तू एक मूर्ख माणूस आहे!” राजकुमारी मैनची म्हणाली. आनंदी शेतकऱ्यांनी आपल्या खांद्यावरून राजकुमारीला उतरवलं.


"धन्यवाद, माझ्या चांगल्या मित्रांनो,” राजकुमारी म्हणाली. “तुम्ही सगळ्यांनी मोठ्या धैर्याने मला मदत केली.”

“माझी प्रिय पत्नी," राजकुमार म्हणाला. “माझ्या मुर्खपणासाठी मला क्षमा कर. माझ्या प्रिय मित्रांनो तुम्ही मला तुटलेल्या गोष्टी नीट करण्यासाठी मदत करा. आणि आता आपण संकट टळलं म्हणून पार्टी करू या.”



महाल परत एकदा सुंदर सजवला. कंदील लावले आणि सगळ्या राज्यातून लोक आले. स्वादिष्ट पदार्थांची एक शानदार पंगत झाली. राजकुमाराने आपल्या बासरीवर अद्भुत संगीत वाजवलं आणि राजकुमारीने नृत्य केलं. आता सगळे लोक आनंदित झाले.










मग राजकुमार मेनिची आणि राजकुमारी मैनिची झोपण्यासाठी आडवे झाले. त्या रात्री एक नोकर आला आणि तो हळू आवाजात म्हणाला, “महाराज गेटवर एक सन्मानीय पाहुणे आले आहेत!” “आता आपण काय करायचं?” राजकुमारी मैनिचीने विचारलं. “चल आता आपण चंद्र बघू या,” राजकुमार मेनिची म्हणाला. “आपण उद्या विचार करू काय करायचं ते.”



समाप्त